# राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचा मोफत व सक्तीचा प्राथमिक शिक्षणाचा कायदा : एक ऐतिहासिक अभ्यास

**प्रा. डॉ . मधुकर खंडू पवार** सहाय्यक प्राध्यापक गोपाळकृष्ण गोखले महाविद्यालय, कोल्हापूर

मोबाईल 9850389805 Email madhukarpawar593@gmail.com

---

**प्रस्तावना**

बहुजन समाजाच्या उद्धाराचे कंकण ज्यांनी खाती बांधले होते त्या महात्मा फुले यांच्यापासून ते राजश्री शाहू महाराजा पर्यंत सर्व समाजसुधारकांनी" शिक्षण " ही सर्व सुधारणा ची गुरुकिल्ली मानली होती. विद्या पासून बहुजन समाज शतकानुशतके वंचित राहिल्यामुळे तो अज्ञान दारिद्र्य यामध्ये खितपत पडलेला होता. विद्या बंदीमुळे देश अधोगतीस जाऊन पोहोचल्याचा मुद्दा प्रतिपादन करताना शाहू महाराज म्हणतात " शिक्षणाशिवाय कोणत्याही देशाची उन्नती झाली नाही असे इतिहास सांगतो " अज्ञानात बुडून गेलेल्या देशात उत्तम विचारवंत लढवय्या वीर कधीही निर्माण होत नाहीत म्हणूनच सक्तीचे व मोफत शिक्षणाची हिंदुस्थानला अत्यंत आवश्यकता आहे. असे प्रतिपादन शाहू महाराजांनी केले.

राजश्री शाहू महाराजांनी संस्थानाचे अनेक क्रांतिकारक कायदे केले. त्यापैकी शंभर वर्षांपूर्वी केलेला सक्तीचा प्राथमिक शिक्षण कायदा हा एक अत्यंत महत्त्वाचा कायदा होय. या कायद्याचा उद्देशा मध्ये शाहू महाराजांनी म्हटले की आमच्या संस्थानातील सर्व प्रजाजनांना लिहिता-वाचता येऊन आपली स्थिती ओळखून सुधारण्यास त्याने समर्थ व्हावे यातील सूचकता आजही विचार करण्यासारखी आहे .या कायद्यामध्ये एकूण पाच भाग असून ते सगळेच महत्त्वाचे आहेत. विशेषता चौथ्या भागातील आपली मुले शाळेत न पाठवणाऱ्या पालकास प्रत्येक मुलामागे प्रत्येक महिन्याला एक रुपयाचा दंडाची तरतूद आणि दंड न दिल्यास जप्तीची तरतूद क्रांतिकारक म्हणावी लागेल. या कायद्यात शिक्षणाची जशी सक्ती होती. तसेच ते मोफत दिले जाणार होते.

राजश्री शाहू महाराजांचा हा कायदा भारतीय संविधान कलम 21 [ क ] नुसार अंतर्भूत आहे परंतु त्याचे स्वरूप आणि अंमलबजावणी हा एक चिंतेचा विषय आहे तेव्हा प्रस्तुत शोधनिबंधात राजश्री शाहू महाराज यांचा प्रार्थमिक सक्तीचा व मोफत शिक्षण कायदा याचा आढावा घेण्यात आलेला आहे

**संशोधनाचा उद्देश**

1] राजश्री छत्रपती शाहू महाराज यांचे शैक्षणिक योगदान अभ्यासणे

2] शैक्षणिक सुधारणा तील क्रांतिकारी कायदा म्हणून राजश्री शाहू महाराज यांनी केलेला प्राथमिक व सक्तीच्या मोफत शिक्षण कायद्याचा अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती व साधने**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा अवलंब केला आहे. तसेच दुय्यम साधनाचा वापर करण्यात आला आहे त्यासाठी प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, वर्तमानपत्र, मासिके, इंटरनेट इत्यादीचा वापर करण्यात आला आहे.

कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक शिक्षणाचा विचार अमलात आणण्यासाठी महाराजांनी एक अभिनव प्रयोग केला प्रत्येक खेड्यांमध्ये एक एक शाळा स्थापन करावयाची व त्या शाळेत पगारी शिक्षक न नेमता खेड्यातील बहुसंख्य असणाऱ्या समाजातून वतनी शिक्षक नेमणूक करायची अशी ती योजना होती. त्यासाठी बापूसाहेब महाराज यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. परंतु वतनी शिक्षकाचा हा प्रयोग फारसा यशस्वी झाला नाही.[१]

**सक्तीच्या शिक्षणाचा कायदा तारीख 21 सप्टेंबर 1917 :**

शाहू महाराजांनी प्रार्थमिक शिक्षणाच्या कायद्याची घोषणा केल्यानंतर सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची नियमावली तयार करण्यासाठी करमकर , प्रोफेसर पंडितराव मराठे अशा तीन ब्राह्मण शिक्षण तज्ञांची समिती नेमली एज्युकेशन इंस्पेक्टर म्हणून डोंगरे यांच्याकडे अभ्यासक्रम तयार करण्याची जबाबदारी सोपवली. तसेच या सक्तीच्या शिक्षण वर एक लाख रुपये खर्च करण्याचे जाहीर केले. ८० हजार रुपये दरबारी खजिन्यातून तर २० हजार रुपये देवस्थान फंडातून खर्च होणार होते. या रकमेतून खर्च होऊन शिल्लक उरणारी रक्कम ट्रेनिंग कॉलेज, शाळा च्या इमारती, शिक्षण उपयोगी साहित्य याकडे कारणी लागणार होती. [२]

**आईबाप व शिक्षणास योग्य वयाची मुले यांचे रजिस्टर ठेवण्याची तरतूद**

ज्या ठिकाणी हा कायदा प्रथम लागू करण्याचे ठरले त्या ठिकाणातील गावातील शिक्षणास योग्य वयाच्या मुलाची यादी व आई बाप यांची यादी मामलेद राने पाटील कुलकर्णी यांच्या मदतीने तयार करावे एका महिन्याच्या आत यादी तयार

करावी व नंतर प्रत्येक वर्षी जुलै महिन्यात तयार करावी यादीची एक प्रत मामलेदारांनी त्या ठिकाणातील शाळेच्या हेडमास्तरांस द्यावे व दुसरी प्रत चावडीवर किंवा अन्य स्थळी प्रसिद्धी ची तारीख घालून लावावी [३]

**पालकांनी मुले शाळेत न पाठवल्यास महिना एक रुपये दंड**

मुलाची यादी प्रसिद्ध झाल्यावर पालकास मामलेदारांनी समनस काढावे त्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे संयुक्तिक उत्तरे न दिल्यास मुलाबद्दल एक रुपया पर्यंत दंड करावा हा दंड प्रत्येक महिन्यात मुले शाळेत जाईपर्यंत करावा. जर पालक समक्ष येऊन गैरहजर मुलाचे दंड भरत नसल्यास पालकांना लेखी नोटीस देण्यात यावी. मामलेदार यांच्याकडे नोटीस पोचल्यापासून 30 दिवसाच्या आत पालकांनी दंड न भरल्यास लँड रेव्ह्यून्यूचे नियमाप्रमाणे जंगम जिंदगी जप्त करून दंडाचा वसूल करावा [४]

**कायद्याची अंमलबजावणी**

या योजनेअंतर्गत 500 ते 1000 लोकसंख्या असलेल्या प्रत्येक गावात प्राथमिक शाळा स्थापन केले. अशा छोट्या गावात शाळेसाठी गावातील चावडी देवळे धर्मशाळेच्या इमारतीत शाळा सुरू केल्या. वर्षभरात संस्थानातील खेड्यापाड्यात 96 शाळा नव्याने सुरू झाल्या.

त्याकाळी प्राथमिक शिक्षकांचे पगार 12 रुपये होता . त्या मानाने ही रक्कम प्रचंड होती. त्या सुमारास महाराष्ट्र कर्नाटक, गुजरात इतक्या प्रदेशावर पसरलेल्या मुंबई प्रांताची ही शिक्षणातील तरतूद एक लाख रुपये नव्हती .

या पार्श्वभूमीवर शाहू महाराज आपल्या संस्थानाच्या उत्पन्नातून एक लाख रुपये प्राथमिक शिक्षणासाठी खर्च करत होते. ही गोष्ट हिंदुस्थानच्या शैक्षणिक इतिहासात अपूर्व मानली गेली पाहिजे. महाराजांनी हा पैसा संस्थानातील प्रत्येक घरावर एक रुपया अशांना मात्र शिक्षण कराच्या रुपाने उभारला. समाजात जी इमानदार सरंजामदार वतनदार यासारखी जी बडी मंडळी होती त्यांनाही या समाज कार्यात सहभागी करून घेतले त्यांच्या उत्पन्नावर शेकडा 10 ते 12 टक्के शिक्षण पट्टी कर बसवला गेला. [५]

**शिक्षणासाठी स्वतंत्र खाते**

1918 सालाच्या प्रारंभीच शाहू महाराजांनी संस्थानात सक्तीच्या व मोफत शिक्षणासाठी खास स्वतंत्र खाते स्थापन केले. त्यावर ‘‘डायरेक्टर आणि एज्युकेशनल इन्स्पेक्टर’’या वरिष्ठ अधिकाऱ्यांची नियुक्ती केली. तसेच हे खाते खुद्द आमच्या नजरेखाली राहील असे महाराजांनी जाहीर केले. संस्थानातील मामलेदार महाल करी यांच्यापासून गावच्या पाटला पर्यंत सर्वांना या प्राथमिक शिक्षण चळवळीत सहभागी करून घेतले [६]

**शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शिक्षणासाठी महाराजांचे लवचिक धोरण**

खेड्यातील शेतकरी आपल्या मुलांना शाळेत पाठविण्यास फारसा राजी होत नसे याचे एक कारण असे होते की, या मुलाचा शेतीच्या कामात हातभार लागत असे यावर उपाय म्हणून महाराजांनी खेड्यातील शेतकऱ्याच्या मुलाने सकाळी किंवा संध्याकाळी दोन तास शाळेत यावे बाकीचा वेळ शेतीकामात घालवावा अशी सवलत दिली. यावरून प्रार्थमिक शिक्षणासंबंधी चे महाराजांचे धोरण लवचिक व वास्तववादी होते याची प्रचिती येते. [७]

**कायद्याचा परिणाम**

1917 व 1918 सालात सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची योजना कार्यान्वित झाली. आली त्यावेळी या योजनेखाली 27 शाळा व 1296 मुले होती. पाच वर्षाच्या कालावधीत 1921- 22. पर्यंत त्यात वाढ होऊन शाळेची संख्या 420 व मुलांची संख्या 22,007 झाली. 1922 पर्यंत कायद्यावर होणारा खर्च तीन लाखापर्यंत गेला. तसेच सक्तीच्या प्राथमिक मोफत शिक्षणाची अंमलबजावणी करीत असताना गरिबासाठी हायस्कूलचे मॅट्रिकपर्यंत शिक्षण मोफत करण्याचा विचार महाराजांच्या मनामध्ये येऊन गेला याचा दाखला त्यांच्या एका आदेशात पाहावयास मिळतो [८]

**निष्कर्ष**

शंभर वर्षापूर्वी ज्या राजश्री शाहू महाराजांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखले त्यांच्या शिक्षण शक्तीच्या वटहुकुमाचे आभार मानावेत तितके कमीच आहेत. अशा प्रकारचे निर्णय घेणारा राजा आपल्याला मिळाला हे आपले भाग्य आहे. आज पासून शंभर वर्षांपूर्वीचा काळ अनेक अर्थाने वेगळा होता. पारतंत्र्यामुळे लोकांची विचारशक्ती खुंटली होती. आपण जर आपल्या प्रदेशातील नवी पिढी शिकली तरच काही बदल होऊ शकतो यासाठी शाहू महाराज आणि प्रत्येकाला शाळेची वाट दाखवली. आज त्याच शाहू महाराजांच्या नगरीत; किंबहुना सर्वत्र शिक्षणाचे बाजारीकरण झाले आहे. प्रवेश घेताना ही आर्थिक गणित मांडले जात आहेत. सध्याच्या नेतृत्वासाठी शाळा काढणे अर्थार्जनाचे साधन बनले आहे सध्याच्या सरकारची नवी धोरणे नवे नियम बदलत आहेत मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाची अंमलबजावणी ठोसपणे केली जात नाही. आजही तळागाळापर्यंत शिक्षण पोहोचलेले नाही. अजूनही ग्रामीण भागात शाळाबाह्य मुले आहेत. त्यांना शिक्षणाच्या

प्रवाहात आणण्यासाठी ठोस पावले उचलली जात नाहीत. तेव्हा ही परिस्थिती सुधारायची असेल तर शाहू महाराजांच्या सक्तीच्या शिक्षण वटहुकुमाच्या कायद्याला खऱ्या अर्थाने न्याय द्यायचा असेल तर सध्याची शिक्षण व प्रवेश प्रक्रिया बदलण्याची गरज आहे.

**संदर्भसूची :**


१ दैनिक महाराष्ट्र टाइम्स कोल्हापूर , गुरुवार 21 सप्टेंबर २०१७

२ किता

३ दैनिक लोकमत कोल्हापूर आवृत्ती , शुक्रवार दिनांक ६ मे २०२२

४ किता

५ डॉ . जयसिंगराव पवार : राजश्री शाहू स्मारक ग्रंथ पृष्ठ क्रमांक ९७

६ सूर्यवंशी क् गो . राजश्री शाहू राजा व माणूस " ठोकळ प्रकाशन, पुणे १९८४ पृष्ठ क्रमांक १२

७ धनंजय कीर " राजश्री शाहू छत्रपती पाप्युलर प्रकाशन मुंबई १९२२ पृष्ठ क्रमांक ७०

८ डॉ . गिरीश मोरे " राजश्री शाहू विचार व कार्य " निर्मिती संवाद कोल्हापूर २०१३पृष्ठ क्रमांक ४४

९ डॉ . रमेश जाधव राजश्री गौरव ग्रंथ " महाराष्ट्र राज्य शिक्षण विभाग, सचिवालय मुंबई २०१६ पृष्ठ क्रमांक १००